थोडक्यात...

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अर्थसंकल्पावरील घडी पुस्तिकेचे प्रकाशन

नागपुर- माहिती व जनसंपर्क विभागाच्या नागपूर विभागीय माहिती संचालक कार्यालयाने महाराष्ट्र शासनाच्या आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी सादर अर्थसंकल्पामध्ये विदर्भासाठी करण्यात आलेल्या तरतुदींवर आधारित घडी पुस्तिकेचे प्रकाशन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज करण्यात आले.

मुख्यमंत्री यांच्या रामगिरी शासकीय निवासस्थानी आयोजित अनौपचारिक कार्यक्रमात हे प्रकाशन पार पडले. नागपूर-अमरावती विभागाचे संचालक डॉ. गणेश मुळे, सहायक संचालक पल्लवी धारव, माहिती अधिकारी रितेश भुयार, मुख्यमंत्री कार्यालयाचे प्रसिद्धी समन्वयक अविनाश महालक्ष्मे, रमाकांत दाणी, अनिल गडेकर यावेळी उपस्थित होते.

अर्थसंकल्पात विदर्भातील कृषी, आरोग्य, उद्योग, शिक्षण, पायाभूत सुविधा आदींबाबत करण्यात आलेल्या तरतुदींची माहिती वैविध्यपूर्ण ग्राफिक्सद्वारे घडी पुस्तिकेत देण्यात आली आहेत. उत्तम रंगसंगती आणि मांडणीमुळे घडी पुस्तिका आकर्षक झाली आहे. विविध शासकीय कार्यालये आणि प्रसार माध्यमांसाठी ही घडी पुस्तिका संदर्भ म्हणून उपयुक्त ठरणार आहे.

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान शिबिर संपन्न

(दशरथ शिंदे/दै.धर्मयोध्दा)

मानवत - तालुक्यातील कोल्हा येथे महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागातील अधिकारी यांच्या उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान शिबिर संपन्न झाले. यावेळी अध्यक्षस्थानी तालुक्याचे तहसीलदार पांडुरंग माचेवाड तर प्रमुख उपस्थितीमध्ये तालुका समन्वय अधिकारी म्हणून उपजिल्हाधिकारी संगेवार मॅडम, मुद्रांक जिल्हाधिकारी रतनसिंग साळक उपस्थित राहिले. यावेळी तालुक्यातील महसूल विभागाबरोबरच पंचायत समिती,तालुका कृषी कार्यालय, भुमिअभिलेख, दुय्यम निबंधक, आरोग्य विभाग,पशुसंवर्धन विभाग, शिक्षण विभाग, इत्यादी विभागातील प्रमुख व त्यांचे कर्मचारी त्यांच्या योजनेचे माहिती देण्यासाठी उपस्थित होते. यावेळी मंडळातील नागरिक महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितीमध्ये प्रत्येक विभागाने आपल्या योजना उपस्थितांना सांगून त्यांचे समस्या निराकरण केले.यामध्ये प्रलंबित फेरफार, सातबारा, विविध दाखले,जसे रहिवास, उत्पन्न,जात ,आरोग्य कार्ड, शिधापत्रिका, कृषी खात्यामार्फत अवजारे, यंत्र वाटप, करण्यात आले. पांदन रस्त्याविषयी प्रत्यक्ष समस्या ऐकून घेऊन निराकरण करण्याचा प्रयत्न केला. यावेळी तालुका कृषी अधिकारी कोरेवाड , गटविकास अधिकारी शिवाजी कांबळे, नायब तहसीलदार संजय खिल्लारे व इतर विभागातील प्रमुख अधिकारी यांचे उपस्थित होती.

परभणी : विशेष मतदार पुनरिक्षण मोहिमेसाठी विशेष कॅम्पचे आयोजन

(दशरथ शिंदे/ दै.धर्मयोध्दा)

मानवत - निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदार यादी अद्ययावत करण्यासाठी विशेष सारांश पुनरिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या अनुषंगाने ९६-परभणी विधानसभा मतदारसंघात विशेष कॅम्पचे आयोजन करण्यात आले आहे. या कॅम्पच्या माध्यमातून नव्या मतदारांची नोंदणी, मतदार यादीतील दुरुस्ती, नाव वगळणे तसेच पत्त्यात बदल यांसारखी कामे करण्यात येणार आहेत. तहसील कार्यालय परभणी येथील सहा. मतदार नोंदणी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत असून संबंधित मतदान केंद्रांवर बूथ लेव्हल अधिकारी यांच्या उपस्थितीत नागरिकांची कामे पूर्ण केली जाणार आहेत. नागरिकांनी आपल्या नावाची पडताळणी करून आवश्यक ते बदल करण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. दरम्यान, परभणीतील इनायत नगर परिसरातही मतदार नोंदणी व मॅपिंग कामासाठी स्थानिक नागरिकांच्या सहकार्याने विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. विचार सेवाभावी संस्था, परभणी तसेच इनायत नगर मतदार कृती समितीच्या माध्यमातून नागरिकांना जनजागृती करून मतदार यादीतील त्रुटी दूर करण्यासाठी मदत केली जात आहे. या उपक्रमात अहजम मेहबूब खान, अशरफ खान, नर्सिंग इनायतनगर, समीउल्ला खान आणि शेख मोहिन आदी सदस्य सक्रिय सहभाग घेत आहेत. प्रशासनाच्या या उपक्रमाला स्थानिक नागरिकांकडून चांगला प्रतिसाद मिळत असून मतदार नोंदणी प्रक्रिया सुलभ करण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन परभणी : विशेष मतदार पुनरिक्षण मोहिमेसाठी विशेष कॅम्पचे आयोजन परभणी : निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदार यादी अद्ययावत करण्यासाठी विशेष सारांश पुनरिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या अनुषंगाने ९६-परभणी विधानसभा मतदारसंघात विशेष कॅम्पचे आयोजन करण्यात आले आहे. या कॅम्पच्या माध्यमातून नव्या मतदारांची नोंदणी, मतदार यादीतील दुरुस्ती, नाव वगळणे तसेच पत्त्यात बदल यांसारखी कामे करण्यात येणार आहेत. तहसील कार्यालय परभणी येथील सहा. मतदार नोंदणी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत असून संबंधित मतदान केंद्रांवर बूथ लेव्हल अधिकारी यांच्या उपस्थितीत नागरिकांची कामे पूर्ण केली जाणार आहेत. नागरिकांनी आपल्या नावाची पडताळणी करून आवश्यक ते बदल करण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. दरम्यान, परभणीतील इनायत नगर परिसरातही मतदार नोंदणी व मॅपिंग कामासाठी स्थानिक नागरिकांच्या सहकार्याने विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. विचार सेवाभावी संस्था, परभणी तसेच इनायत नगर मतदार कृती समितीच्या माध्यमातून नागरिकांना जनजागृती करून मतदार यादीतील त्रुटी दूर करण्यासाठी मदत केली जात आहे. या उपक्रमात अहजम मेहबूब खान, अशरफ खान, नर्सिंग इनायतनगर, समीउल्ला खान आणि शेख मोहिन आदी सदस्य सक्रिय सहभाग घेत आहेत. प्रशासनाच्या या उपक्रमाला स्थानिक नागरिकांकडून चांगला प्रतिसाद मिळत असून मतदार नोंदणी प्रक्रिया सुलभ करण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

नावकी -आहेरवाडी-वडगाव-रिधोरा रस्ता कामावर ग्रामस्थांचा आक्षेप

पुर्णा- पूर्णा तालुक्यातील नावकी आहेरवाडी-वडगाव-रिधोरा रस्त्याच्या कामाबाबत गंभीर तक्रार करण्यात आली असून या कामाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात आली आहे.

या संदर्भात कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग परभणी यांना निवेदन देण्यात आले आहे. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे नावकी आहेरवाडी-वडगाव-रिधोरा रस्ता (प्रजिमा-१०) किमी ३/०० ते ८/०० तसेच राज्य महामार्ग २४९ ते नावकी आहेरवाडीवडगावरिधोरा रस्ता किमी २/८५० येथे लहान पुलाच्या बांधकामाचे काम सुरू आहे. मात्र हे काम मंजूर अंदाजपत्रकानुसार होत नसून निकृष्ट दर्जाच्या साहित्याचा वापर केला जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

नागरिकांच्या मते रस्त्याचे मजबुतीकरण अत्यंत निकृष्ट पद्धतीने करण्यात येत असून काही ठिकाणी रस्ता उखडण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे या संपूर्ण कामाची दक्षता व गुण नियंत्रण विभाग, नांदेड यांच्यामार्फत सखोल चौकशी करून अहवाल सादर करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच दिनांक ५ जानेवारी २०२६ रोजी पाठवलेल्या पत्रावर अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नसल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. चौकशी होईपर्यंत दोन्ही कामे तात्काळ थांबवावीत, अशी मागणी करण्यात आली आहे.

अन्यथा वडगाव आहेरवाडी भीमनगर सुरवाडी आदी चार गावांतील नागरिकांच्या वतीने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपविभागीय कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने जयघोष आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

रमजानच्या पवित्र महिन्यात ८ वर्षीय शेख नातीखचा पहिला रोजा; कुटुंबीयांकडून कौतुक

(वजीर पठाण/दै.धर्मयोध्दा)

हयातनगर- पवित्र रमजान महिन्यात सर्वत्र उपवास, नमाज आणि इबादतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या पवित्र महिन्यात अल्लाहची कृपा मिळवण्यासाठी मुस्लिम बांधव रोजा ठेवून प्रार्थना करतात. अशा या आध्यात्मिक वातावरणात हयातनगर येथील अवघ्या ८ वर्षीय शेख नातीख या चिमुकल्याने मोठ्या उत्साहाने आपल्या आयुष्यातील पहिला रोजा यशस्वीपणे पूर्ण केला. शेख नातीख याने पहाटे सहरी करून दिवसभर संयमाने उपवास पाळला आणि संध्याकाळी इफ्तार करून रोजा पूर्ण केला. रमजान महिन्यात रोजा ठेवणे, नमाज अदा करणे, कुरआन पठण करणे आणि गरीब-गरजूंची मदत करणे हे इस्लाम धर्मात अत्यंत पुण्याचे कार्य मानले जाते. या पवित्र महिन्यात अल्लाहकडून क्षमा, बरकत आणि रहमत मिळावी यासाठी मुस्लिम समाज इबादतीत मग्न असतो. शेख नातीखचा पहिला रोजा पूर्ण झाल्याने कुटुंबात आनंदाचे वातावरण निर्माण झाले. त्याचे वडील शेख राजू, आई,तसेच आजी , यांनी त्याला आशीर्वाद देत कौतुक केले. यावेळी मामा जुबेर पठाण, आमेर पठाण, नासर बेग, आमीनोद्दीन आखील, मतीन शेख, जहीर पठाण, शेख सद्दाम, शेख फिरदोस, बबलू शेख, असलम, इसूब पठाण शेख सोहेल, नसीर पठाण, आणि अनवर शेख, यांसह इतर नातेवाईकांनी उपस्थित राहून शेख नातीखचे अभिनंदन केले. लहान वयातच धार्मिक संस्कार जोपासत शेख नातीखने पहिला रोजा पूर्ण केल्यामुळे परिसरात त्याचे विशेष कौतुक केले जात आहे. रमजान महिन्याच्या पवित्र वातावरणात अशा धार्मिक कृतींमुळे समाजात श्रद्धा, संयम आणि बंधुभावाचा संदेश मिळत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

महिला दिनानिमित्त विविध खेळाचे आयोजन मानवत शहरातील महिलांचा पुढाकार

(दशरथ शिंदे/ दै.धर्मयोध्दा)

मानवत- ८ मार्च जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून नगर परिषद मानवत व स्थानिक महिला यांच्या पुढाकाराने वेगवेगळे उपक्रमाने नाटकेश्वर मंदिर सभागृह येथे महिला दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमांमध्ये मुख्य आकर्षण म्हणजे महिलांसाठी जिंका मानाची पैठणी कार्यक्रम व आनंदनगरी च्या माध्यमातून वेगवेगळ्या खाद्यपदार्थाची मेजवानी. एकूण १६ स्टॉल या कार्यक्रमांमध्ये उभारण्यात आले होते. महिलांनी गृह उद्योगाच्या माध्यमातून तयार केलेल्या वस्तू, हस्तकला, पाककला यांच्या माध्यमातून उभे केलेले स्वतः चे व्यवसाय विक्री व प्रदर्शन या ठिकाणी भरविण्यात आले होते.

स्टॉलच्या माध्यमातून महिलांनी विविध साहित्याची व खाद्यपदार्थाची विक्री करून आर्थिक नफा मिळविला आहे. यामधून महिलांमध्ये व्यवसायाची प्रगती व चालना मिळण्यास मदत होईल. खेळ पैठणीचा या उपक्रमामध्ये प्रथम क्रमांकाच्या पैठणीच्या मानकरी मंगल सोरेकर, दुतीय क्रमांकाच्या मानकरी सुषमा हिबारे, व तसेच विभा लाड या तृतीय क्रमांकाच्या मानकरी ठरल्या आहेत. तसेच सहभागी झालेल्या प्रत्येक महिलेला पारितोषिक देण्यात आले आहे. आयोजित करण्यात आलेल्या वेगवेगळ्या खेळांसाठी पारितोषिकाची व्यवस्था श्रीमती राणीताई अंकुशभाऊ लाड, नगराध्यक्ष नगर परिषद मानवत, तसेच नगरसेविका श्रीमती नंदिनी मोरे, श्रीमती मीरा लाड, नगरसेविका, श्रीमती ज्योती आळसपुरे नगरसेविका, श्रीमती रेखा हळनोर नगरसेविका, श्रीमती भाग्यश्री शिंदे नगरसेविका, श्रीमती वृषाली रहाटे नगरसेविका, श्रीमती अनुराधा वासुंबे नगरसेविका यांनी केली. या कार्यक्रमाचे नियोजन श्रीमती कोमल सावरे मुख्याधिकारी नगर परिषद मानवत यांनी केले. तसेच किर्ती कत्रूवार, मीनाताई देशमुख, सुवर्णा महाजन, जया तोडकरी, एम.डी. पठाण, श्री हनुमंत बिडवे यांनी सदरील कार्यक्रम व्यवस्थित पार पाडण्यासाठी अथक परिश्रम घेतले. जिंका मानाची पैठणी कार्यक्रम विविध खेळच्या माध्यमातून सुनिता झाडगावकर यांनी घेतला. महिला दिनाच्या या कार्यक्रमा साठी मोठया संख्या ने शहरातील महिला व मुली या उपस्थित होत्या. महिलांनमध्ये नेतृत्व गुण, धाडस हें गुण रुजावे, महिला सक्षमीकरण हा उद्देश सफल झाला.

गुंज खुर्द जि.प. शाळेत केंद्रस्तरीय "वर्ड चॅम्पियन" स्पर्धा उत्साहात संपन्न

(गणेश जत्ती/दै.धर्मयोध्दा)

पाथरी - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गुंज खुर्द (ता. पाथरी) येथे केंद्रस्तरीय ''वर्ड चॅम्पियन'' स्पर्धा उत्साहात पार पडली. या स्पर्धेत केंद्रातील एकूण नऊ शाळांनी सहभाग नोंदवत विद्यार्थ्यांनी शब्दसंपत्ती व ज्ञानाची उत्कृष्ट झलक दाखवली. स्पर्धेतील शब्द अंकुर गट (इयत्ता ३ ते ५) मध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उमरा या शाळेने ९० गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला, तर जिल्हा परिषद केंद्र प्राथमिक शाळा गुंज खुर्दने ८६ गुणांसह द्वितीय क्रमांक मिळविला. तर शब्द विकास गट (इयत्ता ६ ते ८) मध्ये जिल्हा परिषद केंद्र प्राथमिक शाळा गुंज खुर्दने ६८ गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. याच गटात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उमरा ही शाळा ६२ गुणांसह द्वितीय क्रमांकावर राहिली. या स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविणारे दोन्ही गट तालुका स्तरावरील स्पर्धेत गुंज खुर्द केंद्राचे प्रतिनिधित्व करणार आहेत. केंद्रप्रमुख घाटुळ ए.एच. यांनी विजयी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. स्पर्धा यशस्वी पार पाडण्यासाठी श्री. शिंदे (मसला तांडा), श्री. बद्दे (गुंज खुर्द), श्रीमती मुळे, श्रीमती होगे, श्री. कराड, श्री. वायभासे, श्री. मगर, श्री. हुलवणे (हिप्परगे), श्री. खेत्री, श्री. चिंते, श्री. लव्हाळे, श्री. गिरी, श्री. पवळे तसेच श्रीमती वळसंगकर यांनी मोलाचे सहकार्य केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये भाषिक कौशल्य, शब्दसंपत्ती आणि आत्मविश्वास वाढीस लागण्यास मदत होत असल्याची भावना शिक्षकांनी व्यक्त केली.

महाराष्ट्र शासनाच्या लोकप्रिय लाडकी बहीण योजनेस अजितदादा लाडकी बहीण योजना असा नामविस्तार करावा अशी राष्ट्रवादीची मागणी

(दिनेश मराठे/ दै.धर्मयोध्दा)

मुंबई -महाराष्ट्र शासनाच्या लोकप्रिय लाडकी बहीण योजनेचा अजितदादा लाडकी बहीण योजना असा नामविस्तार करावा अशी मागणी राष्ट्रवादीची मागणी नायगाव येथील मुद्रा महिला बचत गटाच्या संस्थापक अध्यक्षा ज्योती मनोज माने यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस,उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजितदादा पवार यांच्याकडे केली आहे. या संदर्भात त्यांनी महिला व बालकल्याण विकास मंत्री अदिती तटकरे आणि मुंबईचे जिल्हाधिकारी यांच्याकडे पत्रव्यवहार केला आहे.

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री आजितदादा पवार यांनी आर्थिक नियोजनकरीत महाराष्ट्र राज्यात लाडकी बहीण योजना सुरू केली होती.सदर योजना महाराष्ट्र राज्यात लोकप्रिय अशी योजना ठरली.आपल्या महाराष्ट्रातील गोर गरीब ,आर्थिक परिस्थिती बिकट असलेल्या तसेच स्वभिमानाने जगणाऱ्या सर्वच महिलांसाठी सदर योजना उपयुक्त अशी ठरली आहे. या योजनेचा उद्देश अधिक व्यापक करण्यासाठी सदर योजनेस अजितदादा लाडकी बहीण योजना आसा नामविस्तार करण्यासाठी समस्त लाडक्या बहिर्णींची मागणी आहे. अजितदादा लाडकी बहीण योजना असे नाम विस्तार घोषित केल्यास राज्यातील सर्वच महिला भगिनींना आनंद होईल असे ज्योती माने यांनी म्हटले आहे.

योग शिक्षकांचे रखडलेले मानधन आता तरी द्या

तब्बल एक वर्ष उलथून गेले तरी आरोग्य विभागाचे झोपेचे सोंग

(सचिन रायपत्रीवार /दै.धर्मयोध्दा)

जिंतुर - जिल्ह्यातील सर्वयोग शिक्षकांनी २०२४२५ या वर्षातील तब्बल एक वर्षापासून रखडलेले मानधन तातडीने देण्याची मागणी करत जिल्हा परिषद कार्यालयात मुख्य कार्यकारी अधिकारी माथूर मॅडम यांना निवेदन सादर केले. मार्च २०२५ पासून तब्बल एक वर्ष उलथून गेले तरी आरोग्य विभाग झोपेचे सोंग घेऊन योग शिक्षकाना बनवत आले.या वर्षाच्या मार्च महिन्यात तरी मानधनाबाबत लवकर निर्णय घ्यावा अस न झाल्यास आंदोलनासह उपोषणाचा इशारा शिक्षकांनी दिला आहे. योग शिक्षकांनी दिलेल्या माहितीनुसार, गेल्या वर्षभरापासून मानधन मिळालेले नसून अनेक वेळा प्रशासन व शासनाकडे पाठपुरावा करूनही त्यावर ठोस कार्यवाही झालेली नाही. नागपूर येथे सुरू असलेल्या अधिवेशनाच्या काळातही योग शिक्षकांनी आंदोलन करून शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला होता. मात्र त्यानंतरही कोणताही सकारात्मक निर्णय झालेला नसल्याची खंत शिक्षकांनी व्यक्त केली. राज्यभरातून आरोग्यमंत्री तथा राज्य आरोग्य मंत्री पालक मंत्री यांना वारंवार निवेदने देण्यात आली, तरीही मानधनाचा प्रश्न प्रलंबितच राहिल्याचे शिक्षकांचे म्हणणे आहे. शासनाने काम करून घेतले; मात्र मानधन न दिल्याने योग शिक्षक आर्थिक अडचणीत सापडले आहेत. भरतीचीही कोणतीही प्रक्रिया नसल्याने अनेक शिक्षकांवर बेरोजगारीची वेळ आली आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रश्नात तातडीने लक्ष घालून योग शिक्षकांचे प्रलंबित मानधन मंजूर करावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही योग शिक्षकांनी दिला आहे.

> योग शिक्षकांच्या प्रमुख मागण्या योग शिक्षकांची तात्काळ पुन्हा नियुक्ती करण्यात यावी मागील कालावधीतील रखडलेले मानधन त्वरित अदा करावे अनेक योग शिक्षकांवर बेरोजगारीची वेळ आली असून शासनाने त्याचा गांभीर्याने विचार करावा योग शिक्षणाचे महत्त्व लक्षात घेऊन योग शिक्षकांना न्याय देण्याची मागणी
> **-योग शिक्षक सचिन रायपत्रीवार**

विकासाच्या शब्दाला कृतीची जोड; डॉ. अंकुश लाड यांच्या पुढाकारातून नवा मोंढा परिसरातील रखडलेले काम मार्गी

(दशरथ शिंदे/ दै.धर्मयोध्दा)

मानवत- शहराच्या विकासासाठी सातत्याने पुढाकार घेणारे नेतृत्व म्हणून ओळख निर्माण केलेल्या डॉ. अंकुश लाड यांनी प्रभाग क्रमांक १ मधील नवा मोंढापंचशील नगर परिसरातील दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या रस्ता व नाली बांधकामाला प्रत्यक्ष सुरुवात करून पुन्हा एकदा आपल्या विकासाभिमुख भूमिकेची प्रचिती दिली. नागरिकांना निवडणुकीत दिलेले आश्वासन पूर्ण करत या कामाचा शुभारंभ त्यांच्या हस्ते उत्साहात पार पडला.

नवा मोंढा आणि पंचशील नगर परिसरातील रस्ता अनेक वर्षांपासून खराब अवस्थेत होता. पावसाळ्यात चिखल, साचलेले पाणी आणि नाल्याअभावी नागरिकांचे हाल होत होते. दैनंदिन वाहतूक अडथळ्यात येत असल्याने स्थानिकांकडून वारंवार मागणी होत होती. हा प्रश्न प्राधान्याने सोडविण्याचे आश्वासन डॉ. अंकुश लाड यांनी नगरपरिषद निवडणुकीदरम्यान दिले होते. त्यानुसार निधी मंजूर करून प्रत्यक्ष कामाला गती देण्यात आली.

शुभारंभानंतर बोलताना डॉ. अंकुश लाड यांनी स्पष्ट केले की, विकास ही केवळ घोषणा नसून प्रत्यक्ष कृतीतून नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करणे हेच आपले ध्येय आहे. प्रभाग क्रमांक १ मधील कोणतेही विकासकाम प्रलंबित राहू दिले जाणार नाही. रस्ते, नाल्या, स्वच्छता, मूलभूत सुविधा आणि नागरी विकास यांना समान प्राधान्य देत हा प्रभाग आदर्श बनविण्यासाठी सातत्याने काम सुरू राहील. या विकासकामामुळे परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून पावसाळ्यातील अडचणी दूर होण्यास मदत होणार आहे. स्थानिक नागरिकांनी कामाच्या प्रारंभाबद्दल समाधान व्यक्त करत डॉ. अंकुश लाड यांचा सत्कार करून आभार मानले. ''दिलेला शब्द पाळणारे नेतृत्व म्हणून डॉ. लाड यांनी पुन्हा विश्वास दृढ केला,'' अशी प्रतिक्रिया नागरिकांमधून व्यक्त झाली.

कार्यक्रमास प्रकाश पोरवाल, संजय बांगड, रामनिवास सारडा, गोपाल मंत्री, मोहनराव लाड, दत्ताभाऊ चौधरी, अनिरुद्ध पांडे, अभिषेक आळसपुरे, स्वप्निल शिंदे, गणेश मोरे, संतोष सपाटे, रहीम आडतवाले, चंदनसिंग ठाकूर, आनंद जाधव, जुगलकिशोर काबरा, राजू खरात, राजेश वासुंबे, गणेश वासुंबे, कांताबाई गवळी, विनायक कोरडे, श्रावण गायकवाड, रवी शहाणे, नितीन अवचार, अशोक खंदारे, बापूराव वाकळे, अविनाश रोकडे, राहुल चिंचलवाड, दिनेश बोईनवाड, विठ्ठल निर्वळ, सिद्धार्थ ढाले, रत्नदीप बोराडे, श्याम वाकळे, प्रधान कांबळे, अक्षय खरात, विक्रम शिंदे, अविनाश धापसे, पापणराव फुलारी यांच्यासह महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

दैनिक धर्मयोध्दा हे पत्र मुद्रक, प्रकाशक व मालक शिंदे रामेश्वर गणपतराव यांनी प्रविण प्रिंटींग प्रेस शॉप नं.१४ सुपर मार्केट, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथे छापून धर्मयोध्दा कार्यालय, विकास नगर, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथुन प्रसिध्द केले. **संपादक-शिंदे रामेश्वर गणपतराव**
DHARMA YODDHA Daily Publisher, Printer, Owner by- Shinde Rameshwar Ganpatrao, Printed at Pravin Printing press Shop No 14 Super Market Karegaon Road Parbhani 431401 (M.S) And Published Dharmayoddha Karyalaya Vikas Nagar,Karegaon Road Parbhani. 431401 (M.S) Editor By - Shinde Rameshwar Ganpatrao